
Samachar Patrika RNI 16775/1968 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month




# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५७ वे, अंक ३रा, मुंबई । मे २०२४
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 57, Issue : 3, Mumbai I May 2024
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50





देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार

वर्ष ५७वे, अंक ३रा,
मे २०२४
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही


दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in





चैत्र गौर हळदीकुंकू, धुळे



सामूदायिक व्रतबंध सोहळा, नाशिक



सामूदायिक व्रतबंध सोहळा, संभाजीनगर


HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+ Countries Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS CE
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire


Best Wishes From
SAMARTH
URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELGAVI.
RC NAGAR BRANCH:
"Bhagirathi" R.S.No. 731/D-2, C Scheme, Channamma Nagar Main Road, Belagavi -06 Phone: 0831-2443161
TILAKWADI BRANCH:
CTS. No. 87/B, Mangalwar Peth, Tilakwadi, Belagavi -06 Phone : 0831-2430357
SHAHAPUR BRANCH:
CTS 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur Belagavi-03 Phone: 0831-2431257
KHANAPUR BRANCH:
1524/A6, Mannerikar Building Beside State Bank, Belagavi Goa Road, Khanapur Mob: 6363090655
Unique Deposit Scheme With Attractive Rate of Interest
Kalpataru Deposit Double in 84 Months
HEAD OFFICE:
"Samarth Sadan", Gurukrupa Complex, 1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI-01
Phone: 0831-2431357, 2403968, 4202100
Ajay A. Sunalkar
Chairman
AKSHAY DEPOSIT*
46 Day to 180 Days 6.00% p.a.
181 Days to 364 Days 6.50% p.a.
1 Year 8.00% p.a.
2 Years 9.00% p.a.
3 Years 10.00% p.a.
Senior Citizen Extra 1% (1,2,3 Years)
Abhay V. Joshi
Vice Chairman
BOARD OF DIRECTORS
Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Mrs. Chaya N. Joshi
Arvind S. Kulkarni
Ganapat A. Kulkarni
Raghavendra S. Kesnur (Secretary)
Mrs. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh D. Sunagar
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri
Mrs. Gouri Bidi (General Manager)
*Terms & Conditions Apply

## संपादकीय

बंधु भगिनींनो,

२०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत झालेले अल्प मतदान पाहता चिंतनीय बाब आहे असे मला वाटते. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही असलेला देश आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाले. देशाच्या उज्वल भविष्यासाठी आणि लोकशाही बळकट करण्यासाठी सर्वांनी मतदान करावेच असा आग्रह करण्यात येत आहे. लोकसभेची निवडणुक देशाचे भविष्य ठरवित असते. आपल्या देशाच्या उज्वल भविष्यासाठी संविधानाने आपल्याला दिलेला मतदानाचा अधिकार व आपले बहुमुल्य मत वाया घालवू नका. रोजगार, शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी व देशाच्या बळकटीसाठी आणि देशहितासाठी कार्य करणाऱ्या योग्य उमेदवारांना निवडुन देणे हे आपले कर्तव्य आहे. आपले मत वाया न घालवता मतदान करा आणि आपला हक्क बजावा, ही विनंती.

**– मिलिंद सरदेशमुख**
संपादक

## मनोगत

नमस्कार बंधू भगिनींनो,

आपण सर्वजण सध्या लोकशाहीच्या यज्ञामध्ये सहभागी होऊन मतदान करण्यात किंवा आपल्यातील काही मंडळी निवडणूकीच्या प्रत्यक्ष कामात व्यग्र आहेत. लोकशाहीमध्ये आपल्याला मिळालेला मतदानाचा हक्क आपण सर्वांनी बजावून आपल्या राज्यकर्त्याची निवड करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.

आपल्या संस्थेची निवडणूक सुद्धा होऊ घातली आहे आणि जूनच्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात ती घेण्याच्या दृष्टीने आम्ही सर्वजण कटीबद्ध आहोत. त्यादृष्टीने मतदार याद्या बनविणे हे काम पूर्ण झाले असून पुढील १० दिवसात सर्व संस्थांना त्यांच्या विभागातील मतदारांची यादी निवडणूक अधिकाऱ्याकडून पाठविली जाईल. आपल्या सर्वांना आग्रहाची विनंती की, जसे तुम्ही लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मतदान करून स्वतःच्या आवडीचा लोकप्रतिनिधी निवडीचा हक्क बजावला आहे तसा आपल्या या पवित्र संस्थेचे अध्यक्ष व कार्यकारी सदस्य निवडण्याचा अधिकार आपण निश्चित बजावाल ही आग्रहाची विनंती. निवडणूकीनंतर नवीन दमाचे, नवीन विचारांचे, निरलस आणि निस्वार्थी प्रतिनिधींना निवडून देऊन आपल्या या संस्थेचा उत्कर्ष होवो व सर्वसामान्य सभासदांच्या हिताची कामे होवोत ही श्री प्रभुराम चरणी प्रार्थना!

गेल्या दोन महिन्यांमध्ये संलग्न संस्था प्रतिनिधींची सभा सोलापूर येथे पार पडली. ज्या सभेला ६५ च्या वर कार्यकर्ते उपस्थित होते व संलग्न संस्था व मध्यवर्ती मंडळ यांनी जोडीने कशाप्रकारे कार्य करावे यासंबंधी सूचनांवर विचार झाला. त्यादृष्टीने कार्यही सुरु झाले आहे. या सभेच्या निर्णयानुसार मराठवाड्यातील सर्व संलग्न संस्थेच्या प्रतिनिधींचा मेळावा दिनांक ७ एप्रिल २०२४ रोजी लातूर मध्ये पार पडला. ६० च्या वर प्रतिनिधी हजर होते. अनेक प्रतिनिधी निवडणूकीच्या प्रत्यक्ष कामामध्ये व्यस्त असल्याने त्यादिवशी उपस्थित राहू शकले नाहीत. ही सभा अतिशय उत्साहात पार पडली व मराठवाड्यातील बंधू भगिनींनी यापुढे त्यांच्या कार्यविस्तारा व्यतिरिक्त मध्यवर्ती मंडळची सभा संख्या वाढवण्याचा निश्चय केला असून त्यादृष्टने त्यांनी दर महिन्याला मध्यवर्ती मंडळामध्ये नवीन २५ सभासद करण्याचे आश्वासन दिले आहे. मराठवाड्यातील संस्थांनी

वेगवेगळे धार्मिक उपक्रम राबवून लोकांचे संगठन करण्याचेही ठरविले आहे. याचा निश्चितच फायदा मराठवाड्यातील समस्त देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाला होईल.

अशाच प्रकारचा मेळावा जून–जुलै नंतर उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भा मध्ये घेण्याचा अकोलेकरांचा आग्रह आहे.

दिनांक १३ एप्रिल २०२४ रोजी वासंतिक महिला महोत्सव मध्यवर्ती मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. समाजातील ६० ते ७० महिलांनी यामध्ये भाग घेतला होता. या कार्यक्रमानिमित्त डॉ. रश्मी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दोन सत्रे पार पडली. समाजसेवा क्षेत्रात तसेच त्यांच्या कार्यक्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी केलेल्या महिलांनी त्यांचे अनुभव कथन करून समाजासाठी चांगले सामाजिक उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. त्यादृष्टीने ॲड्. मंजुषा खांडेकर यांच्या संयोजकाखाली व्हॉटस ॲप ग्रुप निर्माण करण्यात आला असून या सर्व महिलांनी समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. त्यांच्या या उपक्रमात मध्यवर्ती मंडळाकडून पूर्ण सहकार्य केले जाईल. त्यांच्या या उपक्रमास आमच्या शुभेच्छा.

**प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

# संलग्न संस्था वृत्त

**मुलुंड** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, मुलुंड तर्फे दि. ३१ मार्च २०२४, रविवार (फाल्गून कृ. ६) रोजी संस्थेच्या सभागृहात ‘एकनाथ षष्ठी’चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात संत ‘श्री एकनाथ महाराजल यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व पूजा करून करण्यात आली. पूजेसाठी श्री. सुभाष जोशी यांची बहुमोल मदत झाली. पूजेमध्ये विश्वस्त अध्यक्ष श्री. विजय वडगबाळकर, कार्याध्यक्ष श्री. भगवान आडगांवकर व विश्वस्त सौ. उज्वला जोशी सहभागी होते. सौ. रेणूका कुलकर्णी यांनी आजच्या सुविद्य प्रवचनकार मा. सौ. अंजली जोशी, पूणे यांचा परिचय करून दिला. सौ. उज्वला जोशी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. सौ. अंजली जोशी यांनी प्रवचनाची सुरुवात प्रथम ‘गीता रहस्य’ या ग्रंथास ११४ वे वर्ष लागले याचे स्मरण करून केली. त्याचप्रमाणे पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांची जयंती असल्याचे आर्वजून स्मरण करून त्यांना अभिवादन केले. त्यांच्या प्रवचनामध्ये त्यांनी विशेष करून संत श्री एकनाथ महाराज यांची पाच वैशिष्ठ्ये विदीत केली.

संत सर्वांना सुख देतात, जसे चंदनाचे झाड कुऱ्हाड तोडते तरी कुऱ्हाडीच्या पात्याला ते सुवासच देते. संत फक्त उपदेशच करीत नाहीत तर ते स्वतःच्या आचरणातून ते दाखवून देतात. संत एकनाथ महाराज त्या काळातही जातीभेद पाळीत नव्हते. संत एकनाथ महाराजांच्या विषयी बरीच मौलीक माहिती त्यांनी श्रोत्यांना विदीत केली. सौ. अंजली जोशी जशा प्रवचनकार आहेत, तशा त्या उत्तम किर्तनकारही आहेत. वेळेअभावी त्यांचे किर्तन आयोजित करता आले नाही, तरी त्यांनी प्रवचन व किर्तन यांचा सुरेख संगम साधून किर्तनाची उणीव भासू दिली नाही. प्रवचनास त्यांनी गायनाची जोड दिल्याने ते अतिशय रंगतदार असे झाले व श्रोते त्यामध्ये रंगून गेले. प्रवचनानंतर संत श्री. एकनाथ महाराज यांच्या प्रतिमेची आरती करण्यात आली. श्री. विजय वडगबाळकर यांनी आभार प्रदर्शन केले. सौ. रेणूका कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन अतिशय प्रभावीपणे सादर केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यात सौ. पद्मा कुलकर्णी, सौ. स्मिता देशपांडे, श्री. वसंत बसरगोड व उपस्थित संख्या सभासद या सर्वांचा मोलाचा सहभाग होता.

**कल्याण** : ३१ वा वर्धापनदिनानिमित्त सत्यनारायण महापूजा व चैत्र गौरी वासंतिक हळदीकुंकू समारंभ दरवर्षीप्रमाणे हे दोन्ही कार्यक्रम तारखेनुसार बुधवार दि. २४ एप्रिल २०२४, रोजी आयोजित करण्यात आले होते. पुजेचे यजमानपद यावर्षी सौ. व श्री. रमेश पालकर (संस्थेचे कार्यवाह) या दांपत्याने भुषविले तर पौरोहित्य श्री. मंदार गुरुजी (संस्था कार्यकारणी सदस्य) यांनी केले. यात कथा वाचन, नैवेद्य, आरती, मंत्रपुष्पांजली होऊन पुजा पाच वाजेपर्यंत संपन्न झाली. या वेळी कार्यकारणी सदस्य तसेच महिला आघाडी सदस्य उपस्थित होते. सौ. शुभांगी कुलकर्णी व इतर सदस्यांनी वासंतिक चैत्र गौर पुजन केले. या कार्यक्रमास कल्याण परिसरातील आमंत्रीत मान्यवर २५ सामाजिक, शैक्षणिक व इतर क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली. त्यात माजी आमदार श्री. नरेंद्र पवार, वरीष्ठ पोलिस निरीक्षक श्री. नरेंद्र पाटील, ब्राह्मण सभा अध्यक्ष श्री. मुकुंदराव बापट, कल्याण जनता सहकारी बँक संचालक श्री. पंकज दांडेकर, श्री. पद्मनाभ जोशी, कर्नाटक संघ, सूर्यवंशी क्षत्रिय समाज ट्रस्ट, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्लोबल असोसिएशन, समर्थ सहकारी बँक, समर्थ पतपेढी व इतर अनेक संस्था पदाधिकारी, कार्यकारणी सदस्य, हिंतचिंतक, नागरिकांनी तीर्थ प्रसादाचा व उपहाराचा, महिलांनी हळदीकुंकूचा लाभ घेतला.

**संभाजीनगर** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संभाजीनगर आयोजित ५१ सर्वशाखिय उपनयन संस्कार २०२४ आज यशस्वी पार पडला. या उपनयन संस्कारात एकूण १२०० ब्रह्मवृंद उपस्थित होते तसेच महाराष्ट्र शासनाचे गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री नामदार अतुलजी सावे साहेब उपस्थित राहून बटूस आशिर्वाद दिले. समन्वय समितीचे मिलिंदजी दामोदरे कव्हचे धनंजय पांडे, विजया अवस्थी गीता आचार्य यांनी सुद्धा उपस्थित राहून बटूस शुभाशिर्वाद दिले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष नरेश जोशी महिला अध्यक्ष मोनिका चौधरी उपाध्यक्ष रवि जेहुरकर, कोषाध्यक्ष अंबादास कुलकर्णी, पदाधिकारी श्रीपाद मुगुटे, प्रशांत दाभाडकर, नरेश पटवर्धन, वैभव देशपांडे, डॉ. अमोल पांडव, गोपाळ कुलकर्णी, मिलींद दाभाडकर, पद्माकर कोटचिरकर तसेच महिला पदाधिकारी सीमा कस्तुरे, उत्कर्षा पारनेरकर, मयुरी दाभाडकर, योगिनी देशमुख, कल्पना जोशी, संध्या मुगुटे, प्रिया कुलकर्णी, जयश्री अकोलकर, सुनीता जोशी, दीपा देशपांडे, अलका जोशी, तनिषा पराडकर, रागिणी पुसेगावकर, निता कुलकर्णी, राधिका कुलकर्णी, मानसी, साक्षी दाभाडकर, समृद्धी चौधरी, चैताली जेहूरकर, आर्यन जोशी त्याबरोबरच अभिरवेद इव्हेंट मॅनेजमेंट चे रवींद्र जोशी, स्वानंदी जोशी यांनी मोलाचे सहकार्य केले. श्री. मंदार कुलकर्णी गुरुजी आणि त्यांच्याबरोबर त्यांच्या पौरौहित विधीचे कार्य सुंदर पार पडले. हा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे यशस्वी पार पडला.

**नाशिक** : देशस्थ ऋग्वेदी संस्थेतर्फे संस्थेच्या तिडके कॉलनीतील ऋग्वेद सभागृहात आयोजित सामूदायिक सोहळ्यात ३० बटूंवर व्रतबंध संस्कार पार पडले. या सोहळ्यात सामूदायिक देवप्रतिष्ठा, चौल, मातृभोजन, भिक्षावळ व स्वरुची भोजन या कार्यक्रमाचा समावेश होतो. पाच बटूंचा व्रतबंध संस्थेतर्फे मोफत करण्यात आला. या सोहळ्यात कोपरगाव, मुंबई, इंदूर, लासलगाव या भागातून बटूनी सहभाग नोंदवला होता. या सोहळ्यासाठी देणगी देणाऱ्यांचा सन्मान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. वेदमूर्ती मनिष पैठणकर, वैभव दाणी व त्यांच्या सहकाऱ्यांनी या व्रतबंध सोहळ्याचे पौरोहित्य केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मुकुंद कुलकर्णी, कार्याध्यक्ष सुहास पाटील, कार्यवाह मकरंद सुखात्मे, महिला शाखेच्या कार्यवाह सुजाता करजगीकर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, सदस्य आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

* देशस्थ ऋग्वेदी संस्था, नाशिक संस्था ९२ वर्ष पूर्ण करुन ९३ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. या वर्धापनदिनाच्या निमित्ताने श्री दुर्गामंगल कार्यालयात श्री सत्यनारायण पुजन व प्रसादाचे आयोजन करण्यात आले. यजमानपदी संस्थेचे सहकार्याध्यक्ष तथा समर्थ सहकारी बँकेचे संचालक श्री. मंदार तगारे व सौ. माधवी

तगारे यांच्या हस्ते पुजा करण्यात आली. पुजेचे पौरोहित्य वेदमुर्ती श्री. पंकज उंदिरवाडकर यांनी केले. या कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. सुहास पाटील, कार्यवाह श्री. मकरंद सुखात्मे, विश्वस्त श्री. मोहिनीराज कुलकर्णी, श्री. रविंद्र वाडीकर, युवकशाखा कार्यवाह श्री. संदीप गोसावी, सदस्य श्री. सचिन निरंतर, श्री. निषाद दशपुत्रे, श्री. प्रशांत निरंतर, श्री. राजेंद्र हातवळणे, महिला शाखा सदस्य सौ. मनिषा पाटील, सौ. रश्मी हातवळणे, संस्थेचे कर्मचारी सौ. दिप्ती हिंगणे, श्री. दत्तात्रय देवळालकर व संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**धुळे** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ धुळे महिला सांस्कृतिक मंडळातर्फे उत्सव सूजनाचा उत्सव वसंताचा अर्थात चैत्र गौर आगमनाच्या निमित्ताने हळदीकुंकवाचा कार्यक्रम नवग्रहीतील रामभाऊ गरुड मंगल कार्यालयात महिलांच्या अमाप उत्साहात काल सायंकाळी संपन्न झाला. या प्रसंगी चैत्र गौरीचे पूजन करून आकर्षक सजावट करण्यात आली होती. महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. रेणुका ताई पेटारे, जेष्ठ साहित्यिका व कवयित्री श्रीमती प्रभा बैकर, श्रीमती जयश्री ताई कुलकर्णी, श्रीमती सीमा ताई जवखेडेकर, महिला सांस्कृतिक मंडळाच्या समन्वयक सौ. गितांजली कुळकर्णी, सौ. संध्या कुलकर्णी, साधना मानेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. सौ. सुषमा पुरोहित यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची संकल्पना मांडली व कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन केले, सौ. संध्या कुलकर्णी यांनी उपस्थित महिलांना येत्या लोकसभा निवडणुकीत जास्तीत संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले. सौ. सुचेता रुद्र यांनी आभार मानले. णहिला सांस्कृतिक मंडळाच्या सौ. विभा क्षीरे, सौ. वैशाली पाटील, सौ. वैशाली मेहरुणकर, सौ. लिना पांडे, सौ. मंजुश्री पूरकर, सौ. जया कुलकर्णी, सौ. रेवती पागे, डॉ. सौ. सुप्रिया कोरान्ने आदींनी संयोजन केले. कार्यक्रमानंतर उपस्थितांना वासंतिक प्रसादाचे वाटप करण्यात आले. खेळीमेळीच्या वातावरणात व महिलांच्या अमाप उत्साहात हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

**बेळगाव** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, बेळगाव व समर्थ अर्बन को. ऑ. व्रेडिट सोसायटी तर्फे रविवार दि. २८ एप्रिल रोजी चिदंबर नगर मधील चिदंबरेश्वर मंदिरात सामुदायिक उपनयन सोहळा पार पडला. या वेळी रोटरीचे राजीव पोतदार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सकाळी चिदंबरेश्वर मंदिरात नित्य पूजा, आरतीनंतर अक्षता रोपण झाले. बेळगाव सह इतर भागातील बटूंचा सामुदायिक उपनयन सोहळ्यात सहभाग होता. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे कार्याध्यक्ष विनायक जोशी, अध्यक्ष विजेंद्र गुडी, सचिव अरुण कुलकर्णी, समर्थ सोसायटीचे उपाध्यक्ष अभय जोशी, संचालक अरविंद कुलकर्णी, सेक्रेटरी राघवेंद्र केसनूर, विनायक जोशी, छाया जोशी, प्रतिप कलकरअमी, सुनंदा आळतेकर आदि यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी अभय जोशी यांनी ठेवी, कर्ज, सोसायटीबद्दल माहिती दिली. तसेच मे महिन्यात संस्थेच्या टिळकवाडी मंगळवार पेठ येथे स्ववास्तुत स्थलांतरण करण्यात येईल अशी माहिती यावेळी देण्यात आली. बटूंना आशिर्वाद देण्यासाठी बेळगाव तसेच परिसरातील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डोंबिवली** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, डोंबिवली यांचा वसंतोत्सवाचा कार्यक्रम दिनांक २१ एप्रिल २०२४ रोजी डोंबिवली येथील वक्रतुंड या सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात संस्थेचे १६० ते १८० सभासद बंधुभगिनी सहभागी झाले होते. चैत्रगोरीच्या पूजनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. जेष्ठ व युवा महिला सभासदांनी सर्व भगिनींना हळदीकुंकू देऊन कार्यक्रमास सुरुवात झाली. उपस्थितांचे स्वागत झाल्यानंतर अध्यक्ष जे. के. जोशी यांनी प्रास्ताविक करुन संस्थेच्या विविध उपक्रमाची माहिती दिली. तद्नंतर कन्नड गिताबद्दल आंतरराष्ट्रीय पारितोषिक मिळालेल्या सुप्रसिद्ध गायिका मुग्धा हसबनीस हिचा परिचय सौ. शुभदा कुलकर्णी यांनी करून दिला. मुग्धा तिच्या जडणघडणीत महत्त्वाचे वाटा असलेल्या तिच्या माता सौ. सुप्रिया

हसबनीस यांचा संस्थेचे युवा नेता श्री. मानस पिंगळे व श्री. जयंत कुलकर्णी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुग्धाने हमीर, यमन, तोडी, भिमपलास अशा विविध रागातील तसेच मनमंदिरा या देस रागातील गीताने रसिकांना मंत्रमुग्ध केले. अंकिता सोवनीचे सुरेख निवेदन इत्यादी या साऱ्यानी कार्यक्रमाला वेगळीच उंची लाभली. उपस्थितांनी भरभरुन दाद ही दिली. वसंतोत्सवाच्या या संपुर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शुभदा कुलकर्णी यांनी केले. सहकार्यवाह निलिमा चिंचणक यांनी सर्वांचे आभार मानले. शुग्रास आंबाडाळ व सुमधुर पन्ह्याने ह्या आनंददायक सोहळ्याची सांगता झाली.

**वडोदरा (गुजरात)** : लोकसभेच्या होऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये जास्तीत जास्त संख्येने मतदान व्हावे यासाठी लोकजागृतीचे महत्तम कार्य सौ. माधवीताई मोगरकर, श्री. विलास भोंडे यांनी केले आहे. वडोदरा येथील एफ.एम. रेडिओवर या दोघांची मुलाखत प्रसारीत करण्यात आली. मतदारामध्ये जागृती व्हावी आणि जास्तीत जास्त संख्येने मतदानाचा टक्का कसा वाढेल याबाबतीत चिंतन प्रसारीत करण्यात आले. देशस्थ ऋग्वेदी संघ, वडोदराचे कार्यवाह श्री. नितिन शहापूरकर यांनी सहकार भारतीच्या माध्यमातून छोटा उदयपूर जिल्ह्यातील सहकारातून निर्मिती झालेल्या गावोगावच्या अनेक सहकारी संस्थांना प्रत्यक्ष भेटी देऊन मतदान जागृतीचे काम पूर्ण केले. या अनोख्या देशहितासाठी केलेल्या कार्याचा गौरव व कौतुक सर्वत्र होत असून देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्या सौ. माधवीताई मोगरकर, श्री. विलास भोंडे व श्री. नितिन शहापुरकर यांचे अभिनंदन व करीत असलेल्या देशहिताच्या कामाचे कौतुक.

**विलेपार्ले** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, विलेपार्ले संस्थेचे श्री. माधव जोशी यांना नुकतीच २ मार्च २०२४ रोजी पुनाखा, भूतान येथील २१ किमी ची भूतान इंटरनॅशनल हाफ मॅरेथॉन शर्यत २ तास १२ मिनिटे या वेळेत पूर्ण केली. या शर्यतीत संपुर्ण रस्ता हा जास्त करून उताराचा व काही चढाचा होता. वातावरण अतिशय थंड होते म्हणून शर्यत सकाळी ८.३० वा. सुरु करण्यात आली. श्री. माधव जोशी व्यवसायाने चार्टड अकाऊटंट असून अंधेरी स्थित स्वःताचे कार्यालय आहे. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण विलेपार्ले संघाचे ते कोषाध्यक्ष आहेत. आतापर्यंत त्यांनी जवळपास ५८ हाफ व फुल (४२ किमी) मॅरेथॉन पुर्ण केल्या आहेत. त्यांचा हा छंद आपल्याला नक्कीच प्रेरणा देईल. अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

**मुंबई** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या वतीने दि. १३ एप्रिल २०२४ रोजी संस्थेच्या मुंबईतील लक्ष्मीनारायण सभागृहात वासंतिक महिला मेळावा संपन्न झाला. मध्यवर्ती संस्थेचे अध्यक्ष श्री. विलास जोशी, कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी, सचिव श्री. मिलिंद सरदेशमुख व कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. रश्मी फडणवीस यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात



झाली. श्रीमती अनिता देशपांडे यांच्या सुमधुर स्वागत गीतानंतर, या वासंतिक कार्यक्रमाची सूत्रे सौ. अरुणा आग्नहोत्री व सौ. ज्योती जोशी यांच्याकडे सुपुर्त करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौ. ज्योती जोशी यांनी करून दिला. सौ. वसुंधरा क्षीरसागर, श्रीमती विजया खडकीकर, डॉ. सौ. स्वेता दुधाट या करीत असलेल्या सामाजिक कार्याचा गौरव करून त्यांना संस्थेतर्फे नारी शक्ती पुरस्काराने गौरविण्यात आले. उपस्थित महिलांपैकी ॲड्. मंजुषा खांडेकर, स्मिता देशपांडे, सरोज मेकल, संगीता कुलकर्णी यांनी देखील आपआपल्या क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी बजावली आहे, याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांनाही गौरविण्यात आले. महिलांच्या उत्स्फुर्त सहभागाबद्दल श्री. विलास जोशी यांनी महिलांचे कौतुक करून अभिनंदन केले. महिलांचे आरोग्य आणि घ्यावयाची काळजी याबद्दल कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. रश्मी फडणवीस यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. श्रीमती माधुरी नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांच्या सुमधुर गाण्याचा कार्यक्रमास श्रोत्यानी भरभरुन दाद दिली. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या महिला सदस्यानी सामाजिक कार्यात आपला ठसा उमटवलेला आहे. त्यांच्या हातून अधिक महत्तम समाजकार्य व्हावे अशी इच्छा मध्यवर्ती संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन सौ. अरुणा आग्नहोत्री व सौ. ज्योती जोशी यांनी केले. वासंतिक महिला मेळावा यशस्वीपणे घडवून आणल्याबद्दल सौ. अरुणा आग्नहोत्री, सौ. ज्योती जोशी, सौ. माधवी सरदेशमुख यांचा सत्कारही करण्यात आला. कार्यक्रमास मुंबईस्थित मुलुंड, कल्याण, विलेपार्ले आदि संस्थेचे बहुसंख्य सभासद उपस्थित होते.




*Protect Capital & Create Wealth.....*

**JAYANT DESHMUKH**

B.COM. CAIIB DBM

**Insurance & Investment Consultant**

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

*Get Insured... & Be Secured....*

# संतांची पसायदानतून दिसणारी समाजाबद्दलची तळमळ

**स. भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

श्री समर्थ रामदास स्वामींनी देव, देश व धर्माकरिता आपले आयुष्य वेचले. बारा वर्षे पुरश्चरण आणि नंतरची अनेक वर्षे देशभर भ्रमंती केली. त्यावेळी त्यांनी धर्माचा प्रसार - प्रचार केला. हे झोपलेले, मरगळ आलेले राष्ट्र निराशेतून उठविण्याचे व इथल्या कणाकणात स्वाभिमान भरून देण्याचे कार्य समर्थांनी केले. हा सर्व व्याप त्यांनी इथल्या जनतेसाठी, समाजासाठी केला. महाराष्ट्र ही संतांची भूमी असणारे राज्य म्हणून ओळखले जाते. संपूर्ण देशातही संतांची खूप मोठी परंपरा आपणांस लाभलेली आहे. प्रत्येक संताने समाज जागृत करण्याचे व त्यास दिशा दाखवण्याचे कार्य केले.

सामान्य माणूस हा फक्त स्वतःपुरता विचार करत असतो, देवाकडेही तो फक्त स्वतःसाठीच काही ना काही मागत असतो. फारतर त्याची झेप आपल्या कुटुंबापर्यंत जाते व तो स्वतःसाठी व कुटुंबासाठीच देवाचा धावा करत असतो. संत हे असे नसतात, वसुधैव कुटुंबकम् ही भावना त्यांचा मनात तर असतेच पण त्याही पुढे जाऊन त्यांना हे माहीत असते की या सृष्टीतील चराचरामध्ये, कणाकणामध्ये तो एकच परमेश्वर भरुन उरलेला आहे. प्रत्येक व्यक्ती प्रत्येक प्राणी हा त्या परमेश्वराचेच रुप आहे. मी आणि समोरची व्यक्ती तत्वरुपाने एकच आहोत. त्यामुळेच माझं - तुझं ही भावना गळून पडलेली असते. त्यामुळेच संत जेव्हा देवाकडे काही मागतात तेव्हा सर्वांच्या फायद्याचं, सर्वांच्या उन्नतीचं व कल्याणाचं असं देवाकडे मागत असतात. अशी सर्वांच्या शांततेची, समृद्धीची व कल्याणाची प्रार्थना म्हणजे पसायदान होय.

पसायदान म्हंटले की आपल्याला संत ज्ञानेश्वरांचे पसायदान आठवते. बारा वर्षांचे असतानाच संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची प्रार्थना करावी वाटणे हाच त्यांच्या श्रेष्ठत्वाचा पुरावा आहे. श्री समर्थ रामदासांनी लिहिलेले पसायदान सामान्य लोकांच्या वाचनात आजवर फारसे कुठे आलेले दिसत नाही. पसायदान हा एखाद्या संताच्या सर्व साहित्याचा सारांश समजला जाते. सर्व साहित्याचे मर्म त्यात समाविष्ट असते.

रघुनाथदासा कल्याण व्हावे। अतिसौख्य व्हावे आनंदवावे। उद्वेग नासो वर शत्रू नासो। नानाविलासें मग तो विलासो । कोडे नसो रे कळहो नसो रे। कापट्य कर्मी सहसे नसो रे। निर्वाणचिंता निरसी अनंता। शरणागता दे बहु धातमाता । अजयो न होरे जयवंत होरे। अपदा नको रे बहुभाग्य हो रे। श्रीमंतकारी जनहीतकारी। परऊपकारी हरिदास तारी।।

श्री समर्थ या पसायदानाच्या द्वारे प्रभू श्रीरामास हे मागणे मागत आहेत की हे रघुनाथा तुझ्या दासांचे कल्याण कर त्यांना आनंदात व सुखात ठेव. जो कोणी भक्त तुझी करेल त्याच्या मनातील उद्वेग कमी कर, त्याचे शत्रू नष्ट होऊ देत. त्याला विविध प्रकारची सुखे लाभू दे. सर्वांचे कल्याण व्हावे हा अतिशय उदात्त असा भाव मनात येण्यासाठी त्या प्रतिचे भान आणि वैश्विक बंधुभावाची भावना मनात असावी लागते. करुणामय अशा अंतःकरणातूनच अशी हाक निघू शकते.

या जगात सर्वात मोठी चिंता कुठली असेल तर ती मृत्युची असते. प्रत्येक व्यक्तीस मृत्युचे भय असते. परंतू संतांना या मृत्युलोकाचे रहस्य उमगलेले असते मृत्यु फक्त शरीराचा असतो हे त्यांना माहीत असते. इतकेच नव्हे तर त्यांचा आत्मा आणि परमात्मा जो तत्वरुपाने चराचरात भरुन असतो हे एकरुप झालेले असतात. त्यामुळेच त्यांना मृत्युचे भय नसते परंतू सर्वसामान्य लोकांना ते असते म्हणून श्री समर्थ इथे मृत्युचे भय दूर कर अशी प्रार्थना करतात. तसेच तुला शरण आलेल्या भक्तांना तुझ्या भक्तीमार्गावर चालवण्याची स्फुर्ती असू

दे. त्यांच्या मनात कुठलीच शंका असू नये व कुठल्याही वाईट कर्मात न गुंतता त्यांचे हित होऊ दे अशी प्रार्थना श्री समर्थ रामदास स्वामी आपल्या पसायदानतून करत आहेत.

संतांचा जन्म त्यांचे अवतरित होणे हे समाजाच्या हितासाठीच असते. ते स्वतःसाठी काहीही मागत नाहीत. संत ज्ञानेश्वर व समर्थ रामदास यांच्या पसायदानतून हे स्पष्ट दिसते की दोघेही स्वतःसाठी काहीही न मागता विश्वाच्या कल्याणासाठी ईश्वराकडे प्रार्थना करत आहेत. समाजाच्या दुःखाची पुरेपूर जाणीव त्यांना असते व त्यातून ते बाहेर पडावे यासाठी ते मनापासून तळमळत असतात.

# आरोग्य स्त्री जीवनाचे

**डॉ. रश्मी फडणवीस** (मो. : ९८२०२८२१३०)

आधुनिक युगातील विज्ञान-संशोधनामुळे स्त्रीच्या आयुष्याचा कालावधी आता पासष्ठ ते पंचाहत्तर वर्षांपर्यंत सरासरीनुसार गणला जातो. बालिका, कुमारिका, तरुणी, गृहिणी, आजी या सर्व टप्प्यांतून स्त्री जात असते. तिच्या वयोमानाप्रमाणे विभागणी खालील प्रमाणे केली जाते. एक ते आठ वर्षापर्यंत ती बालिका असते. आठ ते अठरा वर्षापर्यंत या बालिकेचे-कुमारिकेचे हळूहळू कळीप्रमाणे उमलत फुलात रुपांतर होते. आठ ते बारा वर्षापर्यंत बहुतांशी कुमारिका यौवनात पदार्पण करतात. हे वय इतके लहान असते की निष्पापपणे सर्वत्र वावरणारी बालिका आता एकदम जबाबदारीने वागू शकत नाही. वीस टक्के मुली मात्र बारा ते अठरा वर्षांच्या कालावधीतच यौवनात पदार्पण करतात. तर दोन टक्के मुली या उंबरठ्यावरच उभ्या असतात. त्यानंतरचा काल एकोणीस ते पस्तीस वर्षापर्यंतचा. आता ही तरुणी गृहिणी-गृहलक्ष्मी बनलेली असते. तिच्यावर मातृत्वाचीच नव्हे तर इतर अनेक जबाबदाऱ्या पडतात. या सर्व प्रपंचात ती स्वतःस झोकून देते. वयाच्या छत्तीस ते पंचेचाळीस ते पंचावन्न वर्षांचा कालावधी हा वृध्दापकाळाची चाहूल देणारा, तर यानंतरचा कालावधी आजी बनल्यानंतरचा वृध्दापकाळ. हे टप्पे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे. आयुष्यातील या पायऱ्या स्त्रीला अनेक अनुभव देऊन जातात.

या सर्व कालावधीत स्त्रीच्या शरीररचनेत आणि मानसिकतेत बदल घडत असतात. यामुळे ज्या काही समस्या निर्माण होतात त्या डॉक्टरखेरीज इतर मित्र-मैत्रिणींतही उघडपणे चर्चा करण्यास आपण घाबरतो. अशा समस्यांना कसं सामोरं जायचं हे वैज्ञानिक परिभाषेतील संवादासह माझ्या सर्व रुग्णांना व इतरांना समजावून सांगण्याचा हा अल्पसा प्रयत्न.

स्त्री जननेंद्रियाची अंतर्रचना, अंडकोश, बीजनलिका, गर्भाशय, ग्रीवा यांची माहिती वैज्ञानिक दृष्टीकोनातून आपल्याला आहे. त्या आधारे ज्या समस्या अगदी नवजात बालिकेपासून वृध्दावस्थेतील स्त्रीलाही येतात त्या क्रमवार आपण उलगडत जाऊ.

शिल्पाची कालच नॉर्मल डिलिव्हरी झाली. मी राउंडला गेले असत्या तिच्या नातेवाइकांचे चिंताग्रस्त चेहरे पाहून मी विचारलं, 'अगं काय झालं?' शिल्पा म्हणाली, 'बाळ लघवी करताना माझ्या लक्षात आलं की, लघवीवाटे रक्तस्त्राव होतो आहे. मला काहीच सुचत नाही.' बाळाला तपासून झाल्यानंतर मी म्हणाले, 'अग शिल्पा, घाबरण्याचं काही कारण नाही. तुझं बाळ पूर्ण नॉर्मल आहे. तुझ्या रक्तातील हार्मोन्समुळे तुझ्या बाळाला हा रक्तस्त्राव होत असून एक-दोन दिवसांत तो थांबेल.'

अगदी नवजात बालिकेला जन्मल्यानंतर दोन दिवसांतच अकस्मात मासिकपाळीसारखा रक्तस्त्राव होऊ

लागतो. तेव्हा हा रक्तस्त्राव नैसर्गिक असून तो आपोआपच थांबेल असे डॉक्टरांनी रुग्णाला म्हणजेच रुग्णाच्या मातेला विश्वासात घेऊन सांगण्यास हवे. आईच्या रक्तातील हार्मोन्स मुलीच्या रक्तात येतात. बहुतांशी त्याचे प्रमाण विशिष्ट पातळीपर्यंत असल्यामुळे लघवीवाटे बाहेर टाकले गेल्यास रक्तस्त्राव होण्याचा प्रश्नच येत नाही. परंतु याच रक्तातील इस्ट्रोजनचे प्रमाण विशिष्ट पातळीपेक्षा खाली आले की, नवजात बालिकेच्या गर्भाशयाच्या कोमल अंतःस्त्वचेतून रक्तस्त्राव सुरु होतो. अगदी छोट्या प्रमाणात असलेला हा रक्तस्त्राव पाहून पालकांना चिंताच वाटते. तसेच काही वेळेस नवजात बालिकेच्या स्तनांचिही छोटी वाढ हार्मोस्नच्या असंतुलनामुळे झालेली आढळून येते.

संगणक युगात मासिक पाळीचे वय हे ८ वर्षापासून धरले जाते. पण मासिकपाळी अचानक येत नाही. या आधी पौंगडावस्थेतील बदल आपण समजून घेण्यास हवेत. प्रथम मुलींची उंची वाढते. नंतर स्तनांच्या ठिकाणी फुगीर ऊंचवटे येऊन छोटीशी वाढ होते. तसेच काखेत व जननेंद्रियाठिकाणी बारीक तलम केसांची वाढ होत असल्याचे आढळून येते. जेव्हां हे सर्व बदल पूर्ण होतात त्यानंतर वर्षाच्या आतच मासिक पाळी येऊ शकते. जर मासिक पाळी वयाच्या १२ ते १५ वर्षापर्यंत आली नाही वा आधीच येत असेल तर स्त्रीरोगतज्ञाचा सल्ला घ्यावा तसेच १९ वर्षापर्यंत पाळी सुरु न झाल्यास चिंतेची बाब आहे.

एकंदरीत पाळी वयाच्या आठव्या वर्षी येणं वा १८-१९ वर्षापर्यंत सुरुच न होणं या गोष्टींकडे पालकांनी लक्ष देण्यास हवे.

मासिक पाळी येणे जितके महत्त्वाचे तितकेच त्यात नियमीतपणा असणे, तीन ते चार दिवस रक्तस्त्राव असणे आणि या दिवसात ओटीपोटात कमी वेदना होणे या गोष्टींकडे सर्वांनीच लक्ष देणे स्त्रीजीवनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

कधी कधी ओटीपोटात दुखणे वाढतं, रक्तस्त्राव अधिक होतो तर कधी २८ दिवसांनी येणारी पाळी ही ३५-४० दिवसांनी येते. पाळीतील अनियमीतपणा लक्ष देऊन उपचार करण्याची बाब आहे.

हल्ली फास्ट फूड जमान्यात पी.सी.ओ.डी. हा शब्द वारंवार उच्चारला जातो. हा शब्द इतका सर्रास वापरला जातो की काही वेळेस पालकांना याचे दडपण येते. तसं पाहिलं तर या मागील वैज्ञानिक कारण अतिशय सोपे आहे. अंडकोशास मंदगती येते. यामुळे अंडबीज तयार होऊन अंडकोशाबाहेर टाकण्याची प्रक्रिया मंदावते. कधी कधी एक ते दीड महिना तर कधी तीन महिने या संप्रेरकाच्या (harmones) असंतुलनामुळे मासिक पाळी येत नाही, संप्रेरक-स्त्रावामुळे 'टेस्टोस्टीरॉन' हे द्रव्य वाढल्यामुळे हनुवटीखाली, बेंबीखालील केसांची वाढ दाट होत जाते. चेहऱ्यावर मुरुमे येतात, चिडचिडेपणा वाढतो, स्थूलता वाढते, अशा अनेक प्रकाराने स्त्रीरुग्ण येतो. परंतु सर्वात महत्त्वाचे असे की या बाबीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

महत्त्वाची गोष्ट अशी की अशा संप्रेरक असंतुलनामुळे, हृदयविकार, रक्तदाब, हाडातील बदल या गोष्टी हळूहळू प्रवेश करतात. त्यामुळे वेळीच उपाय केल्यास पुढील धोके टळू शकतात.

हल्ली अल्ट्रासोनोग्राफीमुळे याचे निदान लवकर व अचूक होऊ शकते परंतु जर इलाज करायचाच झाला तर आपण स्त्रीरोगतज्ञाकडेच जावे. अंडकोशाची कार्यक्षमता वाढवून आपण वंध्यत्व टाळू शकता.

म्हणूनच पी.सी.ओ.डी. या संज्ञेस न घाबरता उपचारांसाठी आपण पुढे व्हा. ही अवस्था कायम नसते. यात योग्य आहार, व्यायाम हे महत्त्वाचे.

स्त्रीजीवन ही ईश्वरी देणगी आहे. तेव्हां त्रासिक मुद्रेने त्याचा स्विकार करु नका. स्त्री जीवनाचे व स्त्री आरोग्याचे अनेक पैलू आपण उलगडत जाऊ.

# जोडीदार निवडा

## वधू पाहिजे

✻ **जय शिरीष देशपांडे**, जन्म दिनांक: ८ नोव्हेंबर १९९६, जन्मवेळ – सायंकाळी १९.०७, रास – कन्या, चरण ४थे, गण– देव, नाडी – आद्य, रक्तगट – $O^{+VE}$ ओ +, शाखा – देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, जन्मगाव – जळगाव (खान्देश), नक्षत्र – हस्त, वर्ण – वैश्य, उंची – ५.८, गोत्र – कामकायन, शिक्षण – BE, MBA–, वास्तव्य – ठाणे, नोकरी – सेल्स इंजिनियर (Auto Control Proses Instrumentation Ambarnath, Thane) उत्पन्न – वार्षिक रु.५ ते ७ लाख, अपेक्षा – पदवीधर, ब्राह्मण, मनमिळाऊ, नोकरी (प्राधान्य नाही), संपर्क– ९३२२८८६७४७

✻ **शशांक सदानंद धामणकर.** जन्म तारीख : २८.०८.१९८३, जन्म वेळ : सकाळी १०.२०, शिक्षण : B.E. Mechanical, नोकरी : B. E. Mechanical वार्षिक उत्पन्न : ९.५ लाख, ब्राह्मण पोटशाखा : कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र : आग्नरस, रक्तगट : $O^{+ve}$, उंची : ५.८, वर्ण : सावळा, जन्म स्थळ : गोरेगाव (मुंबई), बांधा : मध्यम, जन्म– लग्न कुंडली : रास : मेष, गण : देव, नाडी : आद्य, चरण : प्रथम, गोत्र : आग्नरस, नक्षत्र : अश्विनी, कौटुंबिक माहिती : वडिलांचे नाव : श्री. सदानंद विश्वनाथ धामणकर, संपर्क क्रमांक : ९८९३६२७३०२ / ९२७०९९५१६३ / ७३७८३०७२७०, अपेक्षा : अनुरुप, पदवीधर, कोणत्याही ब्राह्मण शाखेची चालेल, नोकरीस प्राधान्य.

✻ **पुष्कर दिलीप मेहुणकर.** जन्म तारीख : ०८.०१.१९९०, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र : हरीतस, उंची : ६.१, वर्ण : गोरा, शिक्षण : १२ वी पास (बी.सी.ए. दुसरे वर्ष), व्यवसाय : शेअर मार्केट, डे ट्रेडींग, वार्षिक उत्पन्न रु. ३ लाख, अपेक्षा : मनमिळावु, नोकरी असलेली चालेल, संपर्क क्रमांक : ९८६९४१३०८६, ९८६९४६९१६१.

✻ **वेदप्रकाश उर्फ विनित सदाशिव पानसे :** जन्म तारीख : २३.०६.१९७९, वेळ : सायंकाळी ५.१०, जन्म ठिकाण : सातारा, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, शिक्षण : बी.कॉम, जी.डी.सी. ॲण्ड् ए., कॉम्प्युटर डिप्लोमा, उंची : ५.८, रक्तगट : $AB^+$, वर्ण : गोरा, नोकरी : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग अंतर्गत, मराराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गात सहाय्यक लेखाधिकारी (वर्ग २) (राजपत्रित) पदावर, नोकरीत कायम, मासिक वेतन : रु. ९०,०००/–, गोत्र : मुद्गल, रास : वृषभ, कौटुंबिक माहिती : वडिलांचे नाव : सदाशिव हरी पानसे, संपर्कासाठी दूरध्वनी : ९३२६७२६६४८, ९५४५५१७१४९, अपेक्षा : सुसंस्कृत, अनुरुप, पदवीप्राप्त, संगणक ज्ञान, नोकरी करण्याची तयारी.

✻ **मनीष किशोर दाणी :** जन्म तारीख : २३.१०.१९९८, वेळ : सकाळी १२.३५, जन्म ठिकाण : संगमनेर, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, शिक्षण : Master Computer Science, उंची : ६, रक्तगट : $A^+$, नोकरी : Cleverex Technology, IT Co. Pune, Software Engineer, वार्षिक उत्पन्न : रु. ६ लाख, गोत्र : मुनीर भार्गव, रास : वृश्चिक, नाडी : अंत्य, कौटुंबिक माहिती : वडिलांचे नाव : किशोर मुरलीधर दाणी, संपर्कासाठी दूरध्वनी : ८३०८३४०७७२, ९५६१८९३०४९.

✻ **सुधांशु संजय कुरुलकर :** जन्म तारीख : १३.०४.१९८८, वेळ : रात्री २.५०, जन्म ठिकाण : सोलापूर, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र : भारद्वाज, रास : कुंभ, गण : राक्षस, नक्षत्र : शततारका, चरण : चतुर्थ, नाडी : आद्य, उंची : ५.१०, रक्तगट : $B^+$, शिक्षण : BE + PGDBM, नोकरी : Engineering & IT Services, वार्षिक उत्पन्न : ४९ लाख (Euro ५५,०००), मुलाचे सध्याचे वास्तव्य : Frankfurt, जर्मन, अपेक्षा : अनुरुप, उंची : किमान ५.२, संपर्कासाठी दूरध्वनी : ८७६७३९६५९१.

## वर पाहिजे

* **तेजस्विनी अशोक कोटलगी** (घटस्फोटीत) : जन्म तारीख : ०१.०९.१९९१, शिक्षण : P. G. Diploma Mass Comm., नोकरी / व्यवसाय : फोटोग्राफी, Clothing Business, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : काश्यप, रक्तगट : B+ve, उंची : ५.५, वर्ण : गोरा, रास : वृषभ, **कौटुंबिक माहिती :** वडिलांचे नाव : अशोक कोटलगी, संपर्कासाठी दूरध्वनी : ९९६७८४८१०६, ९८९२६१४८९८ अपेक्षा : मुंबई शहर स्थायिक, आधुनिक विचार सरणीचे कुटुंब, शाकाहारी, दिसायला देखणा, वयातील अंतर ३ पर्यंत.

* **निमिषा मनोज पटवर्धन** : जन्म तारीख : १२.०५.१९९८, जन्म वेळ : १६.४१, शिक्षण : Master in Pharmacy, नोकरी / व्यवसाय : Ozone Pharmaceuticals – New Delhi (Excutive), ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : कोंडिल्य, रक्तगट : O+ve, उंची : ५, वर्ण : गोरा, जन्म स्थळ : ग्वालेर, रास : वृश्चिक, गण : देव, नाडी – मध्य, **कौटुंबिक माहिती :** वडिलांचे नाव : मनोज पटवर्धन, संपर्कासाठी दूरध्वनी : ९८९३४५४१५३ / स्वाती पटवर्धन ९९९३१७०४१८, अपेक्षा : Well settled, Supportive Family.

## भावपूर्ण श्रद्धांजली

देशस्थ ऋग्वेदी मध्यवर्ती संस्थेचे पदाधिकारी व क्रियाशील सदस्य श्री. विवेक देशपांडे यांचे वडील श्री. कृष्णा शंकर देशपांडे यांचे वयाच्या ९७ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन. श्री. कृष्णा देशपांडे हे वेस्टर्न रेल्वे वर्कशॉपमध्ये कार्य केले होते. १९८५ साली निवृत्त झालेले देशपांडे यांचा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजामध्ये समाजकार्यात मोठा वाटा होता. ते दानशूर म्हणून ओळखले जात होते. कृष्णा शंकर देशपांडे यांना मध्यवर्ती संस्थेमार्फत भावपूर्ण श्रद्धांजली. श्री. विवेक कृष्णा देशपांडे कुटुंबिय यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

## देणगी

संस्थेचे सभासद श्री. शशिकांत पुरुषोत्तम विरकर, पुणे यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या विविध उपक्रमासाठी रु. ५०००/- ची ऐच्छिक देणगी धनादेशाद्वारे दिली आहे. आजीव सभासद श्री. शशिकांत पुरुषोत्तम विरकर यांचे मध्यवर्ती मंडळ आभारी आहे.


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर – माहीम विभागातील तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू–वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य–तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई – ४०० ०१६.**

**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**

# श्री यश टूर्स

सेंट्रल रेल्वे हौसींग सोसायटी,
प्लॉट नं. ४१, कल्याण रोड,
डोंबिवली ( पूर्व ) ४२१२०१.

आयोजक : श्रीकांत पाटसकर मोबा. : 9819148002

## कौटुंबिक वातावरणात दर्जेदार सहली

| | | |
|---|---|---|
| हिमालयातील २ धाम<br>केदारनाथ, बद्रीनाथ, हरीद्वार व हृषिकेश | जुन १५<br>खर्च प्रत्येकी रु. ३२,००० + विमान | ७ रात्र |
| हिमालयातील ४ धाम<br>केदारनाथ, बद्रीनाथ, यमनोत्री व गंगोत्री<br>हरीद्वार व हृषिकेश | सप्टें. १८<br>खर्च प्रत्येकी रु. ४५,००० + विमान | ११ रात्र |
| काशी व अयोध्या | ऑगस्ट २० व २८<br>खर्च प्रत्येकी रु. २०,००० + विमान | ४ रात्र |
| काशी, प्रयाग व अयोध्या | ऑगस्ट २० व २८<br>खर्च प्रत्येकी रु. २५,००० + विमान | ५ रात्र |
| स्टॅच्यू ऑफ युनिटी, गरुडेश्वर<br>पोयचा ( स्वामी नारायण मंदिर )<br>व बडोदा | ऑक्टो. ४<br>खर्च प्रत्येकी रु. १५,००० + रेल्वे | ३ रात्र |
| राजस्थान ( मारवाड ), जयपुर, जोधपूर<br>पुष्कर व ओसियन वाळवंट | ऑक्टो. १३<br>खर्च प्रत्येकी रु. २८,००० + विमान | ५ रात्र |

टीप : २ धाम व ४ धाम नॉन ए.सी. हॉटेल वास्तव्य

सुचना : - ए.सी. हॉटेल वास्तव्य (Twins Sharing) ए.सी. बस प्रवास
- सकाळी नाश्ता व भोजन ( दोन वेळचं ), स्थळदर्शन व मार्गदर्शक, प्रवेश शुल्क इ. सहल खर्चात समाविष्ट.

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM

Ravindra Deshpande

RASHMI
ELECTRICAL & CONTRACTOR

Off. No. 2, Shree Siddhivinayak Commercial Complex,
Near Siddhivinayak Temple, Sector 10,
Airoli, Navi Mumbai 400708.
Mob. : +91 98330 71906, +91 98202 68478
Email : recprojects7@gmail.com



*With*
*Best*
*Compliments*
*From*

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**
Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

# स्वातंत्र्यवीर सावरकर : सळसळत्या रक्ताचा धगधगता ज्वालामुखी

**संगीता कुलकर्णी (मो. : ९८७०४५१०२०)**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर म्हणजे प्रखर राष्ट्रप्रेम आणि अतुलनीय प्रतिभाशक्ती यांचा अद्वितीय संगम. साहित्यिक म्हणूनही सावरकरांनी दिलेले योगदान मोठे आहे. आज २६ फेब्रुवारी हा त्यांचा स्मृतिदिन. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे एक विचारी, क्रांतिकारी, राष्ट्रप्रेमी, हिंदुत्वनिष्ठा असलेले, पुरोगामी, कर्मयोगी पुरुष. महाभारतात कृष्णाने सांगितलेली गीता सावरकर जगले. गीता खरोखरचं कोण जगले असेल तर ते स्वातंत्र्यवीर सावरकरच होय.

या थोर राष्ट्रपुरुषाने आपले अवघे आयुष्य राष्ट्रासाठी समर्पित केले आणि तेही कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता. त्यांची चरित्रे, आत्मचरित्रे, त्यांचे साहित्य, विचार, कार्य, त्यांची राष्ट्रनिष्ठा यातून सिद्ध होते. सावरकरांना स्वातंत्र्यवीर ही उपाधी साहित्यसम्राट आचार्य अत्रे यांनी दिली. म्हणजे ज्योतीने तेजाची आरती म्हणतो त्याप्रमाणे एका साहित्यिकाने दुसऱ्या साहित्यिकाचा केलेला गौरव. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या भाषाशैलीत प्रतिबिंबित झाले आहे. कवी, निबंधकार, जीवनदर्शन घडविणारा नाटककार, राजकीय व सामाजिक पार्श्वभूमीवर आधारित कादंबऱ्यांचा लेखक, ग्रंथकार, इतिहासकार, भाषाशास्त्रज्ञ ही साहित्यिक सावरकरांची अनेकविध रुपे आहेत. सावरकरांचे पहिले काव्य म्हणजे वयाच्या अकराव्या वर्षी लिहिलेला स्वदेशीचा फटका होय सावकरांनी त्यांच्या कविता महाविद्यालयात, लंडनच्या वास्तव्यात, अंदमानच्या काळ्या कोठडीत आणि रत्नागिरीत रचल्या. कोठडीच्या भिंतीवर महाकाव्य लिहिणारे हे जगातील एकमेव महाकवी आहेत. शब्दलालित्य, भावोत्कटता, विलक्षण मार्दव व माधुर्य ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. सुस्पष्ट विचार तर्कसंगत मांडणी आणि विचारांच्या अभिव्यक्तीचे सामर्थ्य ही त्यांची बलस्थाने. सावरकरांनी अंदमानच्या तुरुंगात असताना काही उर्दू गझलाही लिहिल्या होत्या. स्वातंत्र्यवीर सावरकर हे इतिहास घडविणारे इतिहासकार होते. त्यांचा शिखांचा इतिहास अप्रकाशित राहिला.

सावरकरांनी विचार प्रवर्तनाबरोबरच भाषा शुद्धीचे प्रत्यक्ष कार्य केले. मराठी भाषते पूर्वी अन्य भाषांमधील शब्दांचा वापर होत होता. तो त्यांनी थांबवून चपखल असे मराठी शब्द दिले. हे योगदान फार महत्त्वाचे. यामध्ये क्रमांक, चित्रपट, बोलपट, नेपथ्य, वेशभूषा, दिग्दर्शक, प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, टपाल, दूरध्वनी, नभोवाणी, ध्वनिक्षेपक, अर्थसंकल्प, विधिमंडळ, परीक्षक, तारण, संचलन, गतिमान, नेतृत्व, क्रीडांगण, सेवानिवृत्ती वेतन, महापौर, हुतात्मा, उपस्थित असे अनेक शब्द मराठी भाषेत सावरकरांनी तयार केलेले आहेत.

सत्तावनचे स्वातंत्र्यसमर, माझी जन्मठेप, सहा सोनेरे पाने ही पुस्तके म्हणजे मराठी साहित्यातील अनमोल ठेवाच. सावरकरांचे नाव घेतले की, यने मजसी नेल हे आर्त गीत व स्वतंत्रता देवीचे स्तोत्र- 'जयोस्तुते' हे आठवल्यावाचून राहात नाहीत. 'ने मजसीने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला' ही मातृभूमीची हाक जपणारे स्वातंत्र्यवीर सावरकर इतिहासातील सुवर्णपान आहे. ज्यांची लेखणी नेहमीच आदरणीय आणि वंदनीय. असामान्य व्यक्तिमत्व आणि कर्तृत्ववान देशभक्त आपल्या विविध पैलूंनी आपली प्रतिभा प्रकट करणारे स्वातंत्र्यवीर सावरकर.

स्वातंत्र्यवीर सावरकर हे केवळ देशभक्त नव्हते तर द्रष्टे समाजसुधारक ही होते. त्यांच्या ठाई अमोघ वकृत्व आणि महाकवीची प्रतिभा विलासात होती तसेच आत्मचरित्रकार आणि नाटककार म्हणून त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला. भाषा आणि लिपी शुद्धी यांचे ते अभिमानी होते तसेच ते हिंदुत्वाचे, हिंदू राष्ट्रवादाचे कडवे पुरस्कर्ते होते. प्रत्यक्षनिष्ठ, प्रयोगक्षम, विज्ञानधर्म हाच सर्वश्रेष्ठ धर्म असे ते म्हणत असतं. चळवळीच्या धकाधकीत आणि अंदमानातील यातनामय, उपेक्षित व एकाकी जीवनात त्यांना साथ दिली व जगण्याचे, लढण्याचे बळ दिले ते त्यांच्या कवितेने. त्यांची एकषष्ठी, पंचाहत्तरी जनतेने मोठ्या उत्साहाने आणि भक्तीभावाने साजरी केली. त्याच वेळी या महापुरुषाच्या मनात आत्मसमर्पणाचे विचार येवू लागले आणि त्याप्रमाणे त्यांनी औषधपाणी, अन्न आणि शेवटी पाणी घेणेही थांबवले. अखेरीस २६ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांनी जराजीर्ण देह काळाच्या स्वाधीन केला. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या दुःखद निधनानंतर 'दैनिक मराठा' मधे आचार्य अत्रे यांनी सावरकर यांच्या दैदीप्यमान कारकीर्दीबद्दल आणि कार्याबद्दल चौदा लेख लिहिले होते. मृत्युच्या माथी पाय देवून ते अशाश्वतातून शाश्वतात विलीन झाले आणि एक धगधगते आग्नकुंड कायमचे थंड झाले. सावरकरांना विनम्र अभिवादन.

**Samachar Patrika RNI 16775/1968 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.




Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH